स्थापना १९५८

जा.क्र.ग्रापं./शिवडाव/६५/ई-निविदा/२०२६/२७
ग्रामपंचायत शिवडाव
तालुका– कणकवली,जि.सिंधुदुर्ग
दिनांक :- १२/०५/२०२६

## ई निविदा सुचना क्र. 1 सन 2026/27

ग्रामपंचायत शिवडाव अंतर्गत सन 2025-26 या वर्षाकरीता खालील नमुद केलेले कामाकरीता मान्यता प्राप्त अधिकृत ठेकेदार निविदाधारक यांच्या कडून ई निविदा पद्धतीने ई – निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | निविदा रक्कम | बयाणा रक्कम | निविदेची शुल्क | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1. | शिवडाव बोध्दवाडी समाजमंदिर ते उत्तम पवार घरापर्यंत जाणारा रस्ता तयार करणे | 1300713/- | 1033016/- | 10500/- | 500/- | निविदा मंजुरी पासून ६ महिने |

## अटी व शर्ती

| | |
|---|---|
| 1) | सर्व पात्र इच्छुक कंत्राटदार यांनी www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर नोंदणीकृत असणे अनिवार्य आहे. |
| 2) | ई निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी कंत्राटदाराने प्रथम डिजिटल सिग्नेचर सर्टिफिकेट व युजर आयडी (DSC) पासवर्ड करुन घेणे आवश्यक आहे. |
| 3) | निविदेतील नमुन्यातील सर्व अटी व शर्ती कंत्राटदारांना बंधनकारक राहील. |
| 4) | वरील कामाची निविदा प्रक्रिया ई निविदा – प्रक्रियेद्वारे ऑनलाईन करण्यात येत असून या निविदे संबंधी यापुढील सर्व सूचना / शुद्धीपत्रके www.mahatenders.gov.in या वेबसाईट माध्यमातून ऑनलाईन करण्यात येतील. |
| 5) | वरील कामाबाबत संपूर्ण माहिती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. |
| 6) | ऑनलाईन निविदा सादर करताना तांत्रिक लिफाफा नं 1 मध्ये खालील (Envelop No.1) प्रमाणे कागदपत्रे अपलोड करावयाची आहेत. |
| | अ) कामाच्या निविदा सादर करताना वरील रकाना क्र. 4 व 5 मध्ये दर्शविलेल्या निविदा व बयाणा शुल्क रक्कम Online पद्धतीने रक्कम भरणा करुन Payment Confirmation Receipt ची स्कॅन प्रत अपलोड करावी. |
| | ब) कंत्राटदाराचे योग्य त्या वर्गातील वैध नोंदणी प्रमाणपत्र, आयकर नोंदणी प्रमाणपत्र, चालू आर्थिक वर्षामधील व्यवसाय कर भरणा केलेल्याचे चलन, पॅनकार्ड, GST प्रमाणपत्र यांच्या सत्यप्रती अपलोड कराव्या लागतील अनुभव प्रमाणपत्र व उपकरणांबाबतची कागदपत्र अपलोड करावी. |
| | क) निविदा धारकाने विहीत नमुन्यातील Declaration of Contractor प्रत अपलोड करावी लागेल. |
| 7) | मंजूर निविदा धारकाने निविदांचे स्टॅम्पपेपरवर करारनामा करुन देणे बंधनकारक आहे. |
| 8) | सदर कामाची निविदा मंजर झाल्यानंतर शासकिय विमा योजना, कामगार कल्याण, उपकर व इतर आवश्यक त्या कपाती देयकातून कपात करण्यात येतील. शासकिय विमा कंत्राटदाराने स्वत: विमा काढल्यास व पॉलिसी सादर केल्यास कपात करण्यात येणार नाही. |
| 9) | सदर निविदेतील कामाबाबत कोणतेही कारण न देता कोणतीही अथवा सर्वच निविदा नाकारण्याचा हक्क ग्रामपंचायतने राखून ठेवला आहे. |
| 10) | कामामध्ये वापलेले साहित्याचे परिक्षण अहवाल व तांत्रिक लेखापरिक्षण त्रयस्थ संस्थेकडून करुन अहवाल या कार्यालयास प्राप्त झाल्याशिवाय कंत्राटदारास अंतिम देयक अदा केले जाणार नाही. |
| 11) | कामाच्या ठिकाणी कंत्राटदारास कामाचे फलक यामध्ये कामाचे नाव, अंदाजपत्रकीय किंमत व काम करणारी यंत्रणा इ. बाबींचा उल्लेख असलेला नामफलक स्वत:च्या खर्चाने कामाचे दर्शनी भागास लावावा लागेल. |

Scanned with CamScanner

| | |
|---|---|
| 12) | निविदा सूचना ही कामाच्या करारनाम्याचा भाग राहिल. |
| 13) | सदर कामाची मुदत निविदा मंजुरी पासून ६ महिने राहील. |
| 14) | ग्रामपंचायत बचत व इतर शासकिय कपाती करण्यात येतील. |
| 15) | शासन निर्णयानुसार कामाचे देयक अदा केले जाईल. |
| 16) | उपरोक्त नमूद कामाकरीता बिलातून कपात करण्यात आलेली सुरक्षा अनामत रक्कम परताव्याचा दोष दायित्व कालावधी हा 1 वर्ष राहिल. सदर कालावधीमध्ये कामाची समाधानकारक गुणवत्ता राहिल्यास तदुनंतरच सदरची रक्कम विहीत कालावधी संपल्यावर कंत्राटदारास प्रदान करण्यात येईल. |
| 17) | निविदाधारकाने ग्रामपंचायत शिवडाव ता. कणकवली यांच्या हितास बाधा पोहचेल असे कोणतेही वर्तन केल्याचे तसेच विहित मुदतीत सेवा न दिल्याचे आढळून आल्यास सदर निविदाधारकाने जमा केलेली बयाणा रक्कम व अनामत रक्कम कोणतीही पूर्व सुचना न देता जप्त करण्याचा व सदर ठेका रद्द करण्याचा अधिकार सरपंच ग्रामपंचायत शिवडाव यांनी राखून ठेवला आहे. |
| 18) | ई निविदेमध्ये सर्व प्रकारची प्रपत्रे निविदा बयाणा रक्कम भरणे अनिवार्य राहिल. कोणत्याही प्रकारची सूट सवलत ग्राह्य धरली जाणार नाही याची सर्व निविदा धारकांनी नोंद घ्यावी. सर्व निविदा ग्राह्य धरली जाणार नाही याची निविदा धारकांनी नोंद घ्यावी. |
| 19) | निविदा धारकाच्या किंवा संकेत स्थळावरील तांत्रिक अडचणीस हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. |
| 20) | उपरोक्त कामाच्या लेखापरीक्षणामध्ये सदर कामाबाबत कोणतेही मुद्दे उपस्थित झाल्यास त्याची पूर्तता करणे संबंधित मक्तेदारास बंधनकारक राहील. |
| 21) | सदर कामाचे अंदाजपत्रक ग्राप कार्यालयात उपलब्ध असून कार्यालयीन वेळेत पाहावयास मिळेल. |
| 22) | अनुदान प्राप्त झालेवरच कामाच्या मुल्यांकनाप्रमाणे मक्तेदाराला रक्कम अदा केले जाईल. कोणत्याही स्वरुपात आगाऊ रक्कम अदा केली जाणार नाही. |
| 23) | मंजूर रकमेला अधीन राहून मा. उपअभियंता बांधकाम जि. प. सिंधुदुर्ग यांच्या मार्गदर्शनाखाली काम करावयाचे आहे. |
| 24) | जर मंजूर निविदाधारक यांनी न्यूनतम दराची निविदा सादर केल्यावर जर ती मंजूर झाली तर अंदाजपत्रक रक्कमेच्या जेवढ्या पटीमध्ये न्यूनतम दर नमूद केला असेल तेवढ्या रक्कमेचा धनाकर्ष निविदा उघडल्यानंतर आठ दिवसाच्या कालावधीमध्ये सरपंच ग्रामपंचायत शिवडाव यांचे नावे कार्यालयीन वेळेत सादर करणे बंधनकारक आहे.<br>उदा. 15% कमी दराची निविदा असल्यास – (5% + 1%) = 6% रक्कमेचा धनाकर्ष<br>न्यूनतम 15% च्या पुढे –<br>उदा. 18% कमी दराची निविदा असल्यास - (5% + 1% + 6%) = 12% रक्कमेचा धनाकर्ष |

सरपंच / ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत शिवडाव
ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत शिवडाव
ता.कणकवली,जि.सिंधुदुर्ग

सरपंच
ग्राम पंचायत शिवडाव
ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग.

Signature Not Verified
Digitally signed by Kunal Santosh Pawar
Date: 2026.05.13 23:06:45 IST
Location: Maharashtra-MH

Scanned with CamScanner